(13)

2017-18 KRP Book

REGISTERED WITH RNI Under No 43658/84
AKSHARVAIDARBHI ISSN -0976-0296 Year-34, Issue-06, Sept.-2017
POSTAL REG. NO. AMT/RNP/136/2015-17



प्रेषक

संपादक अक्षरवैदर्भी,
जनसाहित्य भवन,
गणेश कॉलनी,
अमरावती.
४४४ ६०५

COVER DESIGN & PRINTED BY MANISH CHOPDE 2677198

हा अंक संपादक डॉ. सुभाष सावरकर यांनी मुद्रक रवि इंझाळे, नलिन कॉम्प्युटर्स अॅन्ड प्रिंटर्स अमरावती यांचेकडून

KRP (2017-18)

ISSN -0976-0296

# अक्षरवैदर्भी



प्रा. मनिष चोपडे

वर्ष-३४ अंक-६ १ सप्टे २०१७

[illegible]

[illegible]

[illegible] डॉ. भास्कर पाटील

तीन कथा– २९

- सोन्याचे ताट–अरुणकुमार यादव ४४
- विश्वास–आनंद देशमुख ६२
- व्यसनाधीन–श्रीरंग फ. गावंडे

[illegible]

- '[illegible]'–प्रा. किशोर आर.पाठक

[illegible]

- [illegible] डॉ. [illegible]

[illegible]

- [illegible]

[illegible]

- [illegible]

[illegible]

- [illegible]–विनय मिरगे–[illegible]

[illegible]

- [illegible] आणि [illegible]

अक्षरांच्या काठी –

- '[illegible] संतांमध्ये भेदभाव करणे तथाकथित विद्वानांचे महापाप! :
  डॉ. श्रीपाल सबनीस –डॉ.सतीश तराळ
- स्व.डॉ.अमोल वैद्य नगर वाचनालयाच्या व्याख्यानमालेतून आनंद शोध
  – डॉ.नीळकंठ गो. पेंढे ६

चौदा कविता–

माय–रोशनकुमार शा. पिलेवान (२६) रुक्ष झालेल्या मातीत–सौ.पुष्पा नंदकिशोर गोरे (३७) उसवण–शांताराम हिवराळे (४७) तुझ्यासाठी–(स्व.) ब.शि.पवार/सुखाचा शोध–डी.बी.जगत्पुरिया/मुक्तता–प्रा.स्वाती दामोदरे (५२) येत्या पावसात–रवीन्द्र जवादे (५५) अभियान–विलास वैद्य (६२) भरोसा–अशोक लोटणकर/अक्षरक्रांती–किरण शिवहर डोंगरदिवे/भुरळ–गोविंद मोतलग (६७) भांडण–रावसाहेब जाधव/ओझे–मुबारक शेख/कवी आणि कविता–रमेश नागेश सावंत (६८)


Scanned with OKEN Scanner

परीक्षण

# 'चकवा'

प्रा. किशोर आर.पाठक
सहा. प्राध्यापक, पंकज कला महाविद्यालय, चोपडा, जि.जळगाव. भ्र.९४२१५४८६७१

मराठी कांदबरी वाङ्मयाच्या प्रारंभावर पाश्चात्य साहित्याच्या-विशेषतः इंग्रजी साहित्याचा परिणाम झालेला आहे. इंग्रजीतील नॉव्हेल (Novel) या शब्दाला पर्यायी शब्द म्हणून मराठी मध्ये कादंबरी हा शब्द वापरण्यात आला. १८१८ ला इंग्रजी राजवटीचा उदय झाला. या राजवटीने सामाजिक व भौतिक परिवर्तन घडवून आणले, तसा भारतीय साहित्यावरही या राजवटीचा प्रभाव पडला. शिक्षणाच्या प्रसारामुळे वाचकांच्या संख्येत वाढ झाली. जीवन - जाणीवा व्यक्त करण्याचे काम कादंबरीवाङ्मयाने केले. जरी कांदबरी हा वाङ्मयप्रकार पाश्चात्य असला तरी कादंबरी हा शब्द मुळात अस्सल भारतीय आहे. बाणभट्टाच्या संस्कृत गद्य रचनेवरून मराठीत कांदबरी हा शब्द आलेला आहे. कांदबरी हा साहित्यप्रकार अनुकरणाने निमार्ण झाला व पुढे कांदबरीचा विकास झाला. या साहित्यप्रकारात भरपूर लेखन झाले.




चकवा- डॉ.अलका कुलकर्णी
साधना प्रकाशन, पुणे.
पृष्ठे-१२५, मूल्य- रू. १००/-

'चकवा' या कांदबरीच्या लेखिका डॉ. अलका कुलकर्णी यांनी या कांदबरीत आदिवासी सामाजातील 'डाकीण प्रथे'चे वर्णन केले आहे. सातपुड्याच्या डोंगररांगामध्ये आदिवासी समाजात 'डाकीण प्रथा' पाळली जाते. ही या समाजातील अंधश्रद्धा आहे, ज्या प्रथेमुळे अनेक स्त्रियांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले आहे. मराठी कांदबरीत 'डाकीण प्रथे'चे वर्णन करणारी 'चकवा' ही पहिलीच कांदबरी आहे. नंदुरबार जिल्ह्यातील हरणखुरी गावाचे वर्णन येथे आले आहे.

या कांदबरीतील सेवलीबाय ही स्वतःचा जीव वाचवण्यासाठी जंगलात निघून जाते. तिला जंगलात

(७)

प्यायला पाणी मिळत नाही. तेव्हा गावात तिला कोणी पाहाणार नाही अशा रात्री-अपरात्री ती गावात येऊन हातपंपावरून पाणी घेऊन जाते. तेव्हा तिला जंगलात खायला मिळत नाही. अनेक वेळा उपाशी राहावे लागते. त्यावेळी तिचा मनात विचार येतो की, 'आज सोनियाचा बापू असता तर?' तिला आठवते की, 'आता तिची मुलगी सोनिया नर्स झाली आहे. एक दिवस ती परत येईल व मला आपल्या सोबत घेऊन जाईल.' आपल्या मुलीची वाट बघत ती जीवन जगत असते. अशी या कांदबरीची सुरुवात होते.

या कांदबरीतील प्रमुख पात्र आहे सेवलीबाय. तिच्या पतीचे नाव एमता. त्यांच्या सुखी संसाराचे वर्णन कांदबरीत सुरुवातीस येते. याशिवाय सेवलीबाय आपले घर कसे सजवते, याचे वर्णन येते. एके दिवशी दोघे पती-पत्नी घरी असताना शांताराम गुरुजी त्यांच्या घरी येतात. तिच्या मुलीचे म्हणजे सोनियाचे नाव शाळेत टाकण्यास ते सांगतात. तेव्हा ते दोघे विचार करतात. पण जेव्हा गुरुजींनी सांगितले की, 'तुमची मुलगी शिकली तर ती नोकरी करेल.' तेव्हा ते तिला शाळेत टाकतात. नंतर काही दिवसांनी सेवली गरोदर राहाते. तेव्हा ती 'यहामोगी' मातेची प्रार्थना करते की, 'मला सुरा (मुलगा) होऊ दे.' पण एकदा संध्याकाळी एमता घराचे कौल शाकारत असतो तेव्हा तो सेवलीकडे दोरी मागतो. त्याला दोरी देण्यासाठी ती शिडीवर चढते व खाली पडते, त्यात तिचा गर्भपात होतो. आपल्याला सुरा झाला नाही याचे दुःख तिला होते.

या वेळी सेवलीबायला आपल्यातील कमतरता जाणवते. शेतात तांदळाचे पीक आहे पण आपण मात्र कमनशिबी आहोत हे तिला पुन्हा पुन्हा जाणवत असते. या कांदबरीतील खलपात्र आहे 'पेसऱ्या'. एक दिवस तिच्या शेतात येतो. त्याला पाहिल्यावर सेवलीबायला संताप येतो. यावेळी सेवलीबायला आपल्या सासूची आठवण येते. सासूने मरण्यापूर्वी चांदीची माळ तिला दिली, तसेच एमताकडे लक्ष ठेव असे सांगितले. तिला पुन्हा आठवते की, तिचे लग्न झाल्यावर गावात कॉलराची साथ येते या साथीत तिचे सासू-सासरे मरतात तसेच तिच्या लग्नानंतर तिचे आई-वडिलही मरतात. गावात डॉक्टर येवून सांगतो की, 'दूषित पाण्यामुळे कॉलराची साथ आली आहे तेव्हा पाणी उकळून प्यावे.' पण त्यावेळी गावातील सर्व लोक गावात नवीनच आलेल्या सेवलीबायमुळे हे सर्व होत आहे असे समजतात. तसेच ती डाकीण आहे असे सांगतात. सेवलीचे लग्न होऊन ती गावात आली तेव्हापासूनच हे सर्व घडते, म्हणून लोक तिला 'डाकीण' समजतात.

सेवलीबाय च्या शेजारी राहाणाऱ्या कुसीबायचा मुलगा हा सारखा रडतो व काही दिवसांनी तो मरतो तेव्हा पेसऱ्या सांगतो की, 'या मुलाला नजर लागली' त्यामुळे कुसीबायची सासू वंताबायला वाटते की, 'सेवलीने एकदा मुलाला दूध पाजले होते म्हणून मुलगा मेला.' अशा



प्रकारे गावात जर काही वाईट घटना घडली असेल तर ते सेवलीबायमुळे झाले असे लोकांना वाटते. त्यातच कुसीबायच्या पाच कोंबड्या मरतात तसेच गावातील कोंबड्या देखील मरतात. तेव्हा लोकांना वाटते -'गावात डाकीण आहे व तिची नजर गावाला लागली आहे.' त्यावेळी तालुक्याचे अधिकारी येऊन सांगतात की, 'हा बर्ल्डफ्ल्यू आहे.' पण हे लोक त्यावर विश्वास ठेवत नाहीत.

कुसीबाय ही गावच्या कोतवालाची सून असते. ती व तिचा नवरा हे दोघे नेहमी आजारी असतात. तेव्हा तिला घेऊन तिची सासू भगताकडे येते. या भगताचे नाव गिमल्याभाऊ असते. या भगताला सर्व सांगितल्यावर तो कोतवालाच्या बायकोला सांगतो की, 'तुझ्या सुनेवर करणी झाली आहे.' तसेच पुन्हा सांगतो की, 'साधी सुधी करणी नाय डाकणची करणी.' एमताच्या शेतात ज्वारीचे पीक चांगले आले असते. झिप्याभाऊच्या मदतीने ते त्याला काढायचे असते. पण अचानक टोळधाड येते व सर्व पीक नष्ट होते. तेव्हा गावातील लोकांना वाटते की, हे सर्व डाकीण करत आहे. गावातील स्त्रिया डाकीण कशी असते याची चर्चा करतात. ती उंच असते, केस मोकळे सोडलेले असतात, ती दर अमावस्या व पुनवेला मंदिरात येते तसेच तिला वेगवेगळी रूपे घेता येतात- अशी ती चर्चा. याशिवाय तिला डाकीण मंत्रही म्हणता येतो असे ही सांगतात, यावर उपाय म्हणून गावात 'इंदलपूजा' करावी असे सर्व गावकरी ठरवतात. त्यासाठी प्रत्येक घरातून १००० रुपये जमा करण्यांचे गावकरी सांगतात. त्यावेळी गावकऱ्यांकडे पैसे नसतात, तेव्हा सावकाराकडून कर्ज काढून लोक पैसे जमा करतात. तेव्हा एमता पैसे जमा करायला व मटणाच्या जेवणाला विरोध करतो.

'इंदल'साठी गावोगावी आमंत्रणे दिली जातात. सर्व लोक जमा होतात. पुजारी सर्वांच्या पुढे, त्याच्या मागे तीन कुमारिका व गावकरी चालतात. कदंबाच्या झाडाजवळ आल्यावर त्याच्या तीन फांद्या तोडून त्या गावात आणल्या जातात. सर्व लोक रात्री दारू पितात व सकाळी बोकड कापला जातो. यानंतर सर्व सुरळीत होते. पण गावकऱ्यांना वाटते की, 'टोळधाड डाकिणीमुळे आली.' त्यातच सेवलीबाय विषयी बोलले जाते की, 'ती डाकीण आहे.' उखा गावात सांगतो की, 'हे सर्व डाकिणीमुळे होत आहे.' यानंतर पेसऱ्या हा एमताला दारू प्यायला देतो व गुटक्याचे व्यसन लावतो. काही दिवसांनी 'अस्थंबाची यात्रा' म्हणजे अश्वत्थामाची यात्रा येते. यात्रेला जायचे आहे असे एमता सेवलीबायला सांगतो, तेव्हा ती त्याला विरोध करते. त्यावेळी एमता सांगतो की, 'इंदल पूजेच्या वेळी त्याने विरोध केला त्यांचे प्रायचित्य म्हणून आस्थंबाच्या यात्रेला जावे.' शेवटी एमता, उखा, वंजा, पेसऱ्या यात्रेला जातात. या यात्रेत एमताने सेवलीसाठी चांदीची अंगठी व सोनियासाठी चांदीचे चाळ विकत घेतले असतात.

अस्थंबांचा डोंगर चढून गेल्यावर सर्वांनी अस्थंबाचे दर्शन घेऊन परत येताना उंच कड्यावरून पेसऱ्या एमताला दरीत लोटतो. त्यात एमताचा मृत्यू होतो. गावात सर्व लोक परत येतात. एमताच्या मृत्यूची बातमी सेवलीला समजते. काही दिवसांनी कोतवालाचा मुलगा मरतो. तेव्हा पुजारी प्रेताच्या पोटातून केसांचा पुंजका काढतो. त्यावेळी लोकांना वाटते की, 'गावात हे सर्व डाकीण करते.' गावकरी डाकिणीचा शोध घेण्याचे ठरवतात. सर्वांनी त्यासाठी इंदोऱ्या भगताकडे जायचे ठरवून चारशे सात गाडी भाड्याने केली जाते. सर्व लोक भगताकडे जातात. जेव्हा यांचा नंबर येतो तेव्हा कोतवाल मुलगा मेला हे सांगतात. त्यावेळी भगताने हातात ज्वारीचे दाणे घेऊन इकडे तिकडे करायला सुरुवात केली व काही वेळाने गावात डाकीण कोण आहे? हे सांगायला सुरुवात केली,- 'ज्या स्त्रीच्या घरामागे तीन मोहाची झाडे आहेत तसेच जिचा पती मेला आहे, सासू सासरे मेले आहेत, तिच्या घरात किती कोंबड्या किती बकऱ्या आहेत हे सर्व सांगते. कारण पेसऱ्याने त्याला आधी भेटून १००० रूपये दिले, तसेच सेवलीबायची सर्व माहिती देऊन तिला डाकीण ठरवावे असे सांगितले होते.

सर्व लोक गावात सकाळी येतात. आल्यावर सर्वजण सेवलीला शिव्या द्यायला सुरुवात करून लाठ्या काठ्या घेऊन तिला मारायला जातात. त्यावेळी वेस्ताबाय तिला सोडवते. सेवलीला घरातून बाहेर यायला बंदी केली जाते. तिच्या शेतातील धान्य चोरून नेले जाते. धान्य चोरीची गोष्ट रावतळेसाहेब या पोलीस अधिकाऱ्याला कळते. ते चौकशीसाठी गावात आल्यावर त्यांना उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. त्यानंतर पेसऱ्या सांगतो की, 'एमताने त्याचे शेत ऐंशी हजार रुपयाला त्याला विकले आहे.' सेवली ते मान्य करीत नाही. ती तालुक्याला जाऊन त्याची चौकशी करते. तेव्हा शेत एमताच्याच नावावर असते. पुन्हा जातपंचायत भरते. त्यात पेसऱ्या शेत विकत घेतल्याचे सांगतो. तेव्हा सरपंचाना आठ दिवसांनी पुन्हा जातपंचायत भरवण्यास सांगते. या घटनेची चौकशी आनंदा पाटील हा स्थानिक पत्रकार व अमेय हे दोघे कार्यकर्ते करतात. त्यासाठी गावात येतात, पण कोणीही माहिती देत नाही. परत जात असताना त्यांचा अपघात होतो. त्यात आनंदचा पाय मोडतो.

सेवलीबायसाठी पुन्हा पंचायत भरते. यात शेत कोणाचे यावर निकाल दिला जाणार असतो. त्यावेळी सेवली 'मी डाकीण नाही असे सांगते.' पण गावकरी ते ऐकत नाहीत. गावकऱ्यांनी तिला गाव सोडून जायला सांगितले त्यावेळी एक तरुण तिचे फोटो काढत असतो. काही दिवसांनी तो फोटो पेपरमध्ये येतो. हा फोटो पाहिल्यावर मंत्र्याचा पी.ए. अस्वस्थ होतो. मुख्यमंत्र्यांना वाटते की आता निवडणुका जवळ आहेत, लोक आपल्याला मत देतील का? यातच अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते सेवलीला डाकीण ठरवल्याचा विरोध करतात. या विरोधात लढा देण्याचे



ठरवतात व 'सेव्ह सेवली' क्लबची स्थापना करतात. गावकऱ्यांचा सेवलीला त्रास होतो, तिला घराबाहेर पडता येत नाही. तिला घरात अंधारात बसून राहावे लागते. आनंद पोलीस पाटलांची परिषद घेतो, त्यात सांगतो की 'गावात एखादी अप्रिय घटना घडली की. तिचे खापर एखाद्या स्त्रीवर फोडायचं. तिला डाकीण ठरवायच., स्वत:चा अपराधीपणा लपवण्याचा हा एक उत्तम उपाय आहे.' त्यावेळी हरणखुरी गावाचा पोलीस पाटील काहीच बोलत नाही.

आनंद व अमेय जातपंचायत व बुडव्या भगता विरोधात केस दाखल करतात. यावर काय करावे यासाठी पुन्हा जातपंचायत बोलवली जाते. त्यानंतर सेवलीचे दार जोरजोरात वाजवले जाते. तेव्हा वेस्ताबाय सेवलीला सांगते की, 'लोक तुला मारायला येत आहेत, तू जंगलात पळून जा.' तेव्हा ती जायला तयार नसते. पण वेस्ताबाय जबरदस्तीने तिला जायला लावते. सेवली जंगलात राहात असल्याने तिच्या केसांच्या जटा होतात, कपडे फाटतात, खायला भाकरी मिळत नाही. त्यावेळी ती कुसीबाईची भाकरी हिसकते व जंगलात पळून जाते. त्यावेळी तिच्या सोबत एक काळं कुत्रं असते. अशा परिस्थितीत तिला वाटते की, 'माझी मुलगी परत येईल व मला इथून तिच्या सोबत नेईल.'

'चकवा' या कांदबरीत एका सर्वसामान्य स्त्रीला डाकीण ठरवले जाते व तिला कसा त्रास दिला जातो याचे वर्णन आले आहे. यातून गावकऱ्यांची अंधश्रद्धा दिसून येते. या शिवाय या कांदबरीत काही पावरा बोलीतील शब्दांचा वापर केला आहे. त्यात प्रामुख्याने सुरा, सुरी (मुलगा, मुलगी), कुदरी(खिचडी), कोहह्यु(वाळलेल्या भोपळ्यापासून तयार केलेले पाणी भरण्याचे भांडे), लाडी(पत्नी), ववडी(सून), हाहू (सासू), होहुरू (सासरा), माल्ही(मोरी), पाडी(म्हैस) याशिवाय राणी काजोल माता, यहामोगी माता या देवींचा उल्लेख आलेला आहे. आदिवासी समाजातील 'गुलाल्या बाजार', 'नवाय पूजा', 'इंदल पूजा', 'अस्थंबाची यात्रा' - यांचे वर्णन आले आहे. डॉ. अल्का कुलकर्णी यांनी आपल्या ओघवत्या भाषाशैलीतून या कांदबरीचे लेखन केले आहे. पात्रांच्या तोंडी आदिवासी भाषेतील शब्द वापरले असल्याने ही कांदबरी वेगळी ठरते. विशेष म्हणजे आदिवासी समाजातील डाकीण प्रथेचे वर्णन करणारी ही पहिलीच कांदबरी आहे. या कांदबरीतून 'डाकीण प्रथे'ची माहिती वाचकांना होते. आदिवासी समाजातील 'डाकीण प्रथे'चे वर्णन करणाऱ्या डॉ. अलका कुलकर्णी या समर्थ कांदबरी लेखिका आहेत.

■ ■ ■

# १९७५ नंतरचे मराठी नाटक

## आशय आणि रचना



2017-18
ADM - Book

Prashant

डॉ. माणिक माधव बागले

ADM

Scanned with OKEN Scanner

# १९७५ नंतरचे मराठी नाटक : आशय आणि रचना

1975 Nantarche Marathi Natak : Aashay Aani Rachana

© सुरक्षित

**प्रकाशक व मुद्रक**

रंगराव पाटील । प्रशांत पब्लिकेशन्स: ३, प्रताप नगर, श्री संत ज्ञानेश्वर मंदिर रोड, नूतन मराठा महाविद्यालयाजवळ, जळगाव ४२५००१.

**दूरध्वनी:** ०२५७-२२३५५२०,२२३२८०० **ईमेल:** prashantpublication.jal@gmail.com

**प्रथम आवृत्ती:** डिसेंबर २०१७ **आयएसबीएन:** ९७८-९३-८५०१९-००-५

**मुखपृष्ठ:** स्वप्नील फलटणकर **अक्षरजुळवणी:** प्रशांत पब्लिकेशन्स **मूल्य:** ₹ ४५०

या पुस्तकातील कोणताही मजकूर, कोणत्याही स्वरूपात वा माध्यमात पुनर्प्रकाशित अथवा संग्रहित करण्यासाठी लेखक आणि प्रकाशक दोघांचीही लेखी पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे.

www.prashantpublications.com



Scanned with OKEN Scanner

१७. १९७५ नंतरची अहिराणी रंगभूमी........................................................१०२
– प्रा. डॉ. फूला मोतीराम बागुल
१८. १९७५ नंतरचे प्रमुख मराठी नाटककार व नाटक...................................१०८
– प्रा. डॉ. वाल्मिक शंकर आढावे
१९. १९७५ नंतरच्या आंबेडकरी नाटकांची आशयसूत्रे...................................११३
– डॉ. प्रकाश अर्जुन भामरे
२०. प्रयोगशील नाटककार – रत्नाकर मतकरी..............................................११९
– प्रा. डॉ. किशोर मंगेश पाटील
२१. 'अंधातर' ते 'लालबाग परळ' (झाली मुंबई सोन्याची)..............................१२५
: वास्तवाचे माध्यमांतर
– प्रा. डॉ. योगिता आशुतोष पाटील
२२. १९७५ नंतरचे 'युगवाणी' या नियतकालिकातील ..................................१३०
एकांकिका व नाट्यलेखन
– प्रा. स्वप्निल चंद्रशेखर देशमुख
२३. नभोनाट्य : व्यग्र जीवनास नाट्यात्म संजीवनी ....................................१३६
– प्रा. डॉ. पुरुषोत्तम शेषराव जुन्रे
२४. १९७५ नंतरचे आंबेडकरी नाटक......................................................१४१
– प्रा. डॉ. जितेंद्र शामसिंग गिरासे
२५. जयवंत दळवी यांची समस्याप्रधान नाटके : काही निरीक्षणे ......................१४८
– प्रा. योगेश देविदास पाटील
२६. १९७५ नंतरचे मराठी आंबेडकरी नाटक............................................१५५
– प्रा. अरूण दामू मोरे
२७. १९७५ नंतरची आंबेडकरी नाटके ....................................................१५९
– मनिषा सदाशिव डोंगरे
२८. १९७५ नंतरच्या 'वाटा-पळवाटा' : आंबेडकरी नाटकाचे वेगळेपण ............१६३
– मोनाली रिपोटे
२९. १९७५ नंतरच्या स्त्री संघर्षाची जाणीव असलेल्या नाटककार.......................१६७
– ज्योती म्हापसेकर व मीना देशपांडे
– प्रा. प्रशांत काशिनाथ पाटील
३०. जयवंत दळवी यांची समस्याप्रधान नाटके............................................१७१
– प्रा. प्रेमसिंग मानसिंग गिरासे
३१. 'वाटा-पळवाटा' : एक संघर्षप्रधान नाटक..........................................१७३
– प्रा. डॉ. दिनेश हिंमतराव पाटील
३२. मराठी नाटक आणि राजकारण (जयवंत दळवी यांचे 'सुर्यास्त' नाटक).........१७७
– प्रा. डॉ. माणिक माधव बागले
३३. १९७५ नंतरचे मराठी नाट्यवाङ्मय : आकलन आणि विश्लेषण...............१८२
– प्रा. डॉ. रमेश नामदेव माने



Scanned with OKEN Scanner

# १९७५ नंतरचे मराठी आंबेडकरी नाटक

**प्रा. अरूण दामू मोरे**
मराठी विभाग, पंकज कला महाविद्यालय, चोपडा, जि. जळगांव.

मराठी साहित्यात १९७५ नंतर दलित साहित्य हा प्रवाह स्थिरस्थावर झालेला दिसून येतो. १९७५ नंतरचे दलित नाटक, दलित एकांकीका खऱ्या अर्थाने प्रबोधनाच्या पातळीवर जाऊन परिवर्तनाचा विचार रूजविणाऱ्या आहेत. म्हणून दलित साहित्यात आंबेडकरी नाटकाचे योगदान अधिक महत्वपूर्ण व नोंद घेण्यासारखे आहे. १९७५ नंतरच्या आंबेडकरी नाटकातून दलित समाजाचे अधिक वास्तवपूर्ण चित्रण प्रदिर्घ अनुभवातून आलेले दिसते. खऱ्या अर्थाने आंबेडकरी विचारधारा व प्रबोधनाची कल्पना मूर्त स्वरूपात रूजविणारा हा साहित्य प्रवाह आहे. दलित साहित्य हे मुळातच आंबेडकरी परिवर्तनाच्या विचारावर उभे आहे. परिवर्तन हाच दलित साहित्याचा आत्मा आहे. या संदर्भात प्रसिध्द नाटककार प्रा. दत्ता भगत म्हणतात, ''दलित नाटक हे केवळ आंबेडकरी विचारांच्या प्रसारासाठीच जन्मले नसून त्या विचारांच्या साक्षात्कारासाठी जन्मले आहे.'' आंबेडकरी नाटकाचा मुळ हेतू परिवर्तनाचा विचार हा समाजातल्या सामान्य माणसाच्या जवळ घेऊन जाणे हा आहे. दलित नाटकाच्या निर्मितीची प्रेरणा 'आत्मशोध' ही आहे. आणि हा आत्मशोधाचा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार आहे. दलित जीवन जगतांना सोसाव्या लागणाऱ्या यातना, दु:ख, हालअपेष्टांपासून स्वत:चा शोध घेण्याची वृत्ती ही आत्मशोधाची जाणीव प्रबळ झालेली दिसते. रंगभूमी आणि नाट्य चळवळ ही समृद्ध आहे. विद्रोही जाणीवांचा धगधगता अविष्कार म्हणजे दलित नाटक. दलित नाटकाची भाषा जीवनाप्रमाणेच कठोर, रांगडी आणि बेडर आहे. स्पष्टक्तेपणा हे महत्वाचे वैशिष्टये या नाटकात आढळते.

१९७५ च्या आंबेडकरी नाटकात अतिशय महत्वाचे नाटक लिहणारे नाटककार म्हणून भि.शि. शिंदे, दत्ता भगत आणि प्रेमानंद गज्वी यांचे नाव घेणे महत्वाचे आहे. या नाटककारांनी झालेला अन्याय, अत्याचार हाच विषय घेवून पूढे सरसावलेले दिसतात.

दलित साहित्यात 'दलित नाटक' या वाङ्मय प्रकारातील महत्वाचे नाटककार म्हणून ओळखले जाणारे भि.शि. शिंदे हे होय. दलित वर्गावर झालेला अमानुष छळ, मग नामांतराचा असेल की जातीयतेच्या दंगलीचा हाच विषय घेऊन त्यांनी



Scanned with OKEN Scanner

'काळोखाच्या गर्भात' हे नाटक लिहले आहे. अत्यंत वेदनेने भरलेली त्यांची लेखणी ह्या नाटकातून पहावयास मिळते. म्हणून हे नाटक समाजासमोर मांडण्यास त्यांची लेखणी यशस्वी झालेली आहे, असे दिसून येते. दलित नाटक 'काळोखाच्या गर्भात' (१९८१) या नाटकाने दलित नाटक या वाड;मय प्रकारात मोलाची भर घातलेली दिसते. या नाटकाचा मुख्य विषय म्हणजे नामांतर आंदोलन हा आहे. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे ह्यासाठी दलितांनी सुरू केलेला लढा व सवर्णाचा विरोध ही पाश्वभूमी या नाटकाचा विषय म्हणून पुढे येते. या नाटकाच्या माध्यमातून लेखक भि.शि. शिंदे हे वेगळयाच प्रकारे विचार व्यक्त करतांना दिसतात. म्हणून हे नाटक एकाप्रकारे विचारनाटय आहे, असे म्हणता येते. एकीकडे दलितांचे अश्रू, घाम, रक्त पेटत होते तर दुसरीकडे सवर्णाचे मग्रुर फुत्कार ऐकू येत होते. स्वातंत्र्योतर काळात दलितांची कशी होरपळ झाली यांचे दिग्दर्शन करणारे हे नाटक आहे. या नाटकाविषयी आपले विचार मांडत असतांना विजय तेंडुलकर यांनी या पुस्तकाच्या प्रस्तावनेत असे म्हटले आहे की, ''काळोखाच्या गर्भात' या नाटकाचा रोख पांढरपेशा प्रेक्षकाकडे आहे.'' आपल्या सभोवतालचे वास्तव भि.शि. शिंदे चित्रीत करतांना दिसतात. त्यावेळची पार्श्वभूमी लक्षात घेऊनच हे नाटक साकारताना दिसते. या नाटकाचा मुख्य रोख लक्षात घेतला तर सवर्ण समाजातील गावकरी दाजी सकटची हत्या करतात. दाजी सकट दुसरा तिसरा कोणी नसून तो पोचिराम कांबळे आहे. तो जातीने मातंग समाजातील आहे. नामांतराची दंगल साधून सवर्णानी पोचिराम कांबळेची हत्या केली आहे. आणि न्यायालयाने खुन्यांना निर्दोष सोडलेले आहे. तेव्हा पोचिराम कांबळेचा मुलगा या नाटकातील नायक सिद्राम सकट यांच्या मनात सुडाची भावना लेखक भि.शि. शिंदे हे टिपतांना दिसतात. नाटकातील नायक सर्व खुन्यांची हत्या करतांना दिसतो. 'काळोखाच्या गर्भात' या नाटकाचा शेवट एक प्रसंगाने झाला आहे. शेवटी नाटकाचा नायक हातात कुऱ्हाड घेतांना दिसतो. या न्यायव्यवस्थेशी लढा देण्यासाठी म्हणजे या नाटकाच्या माध्यमातून लेखकाला हे सांगायाचे आहे की, हजारो सिद्राम सकट हे काळोखाच्या गर्भात अडकलेले आहेत. ते बाहेर येण्यासाठी धडपड करत आहेत. त्यांना या काळोखाच्या बाहेर येऊन द्या. त्यांच्या हातात शस्त्र देवू नका तर शास्त्र द्या. दलित समाज हा काळोखातच अडकून पडला आहे. अन्याय अत्याचाराला बळी पडत चाललेला आपणास दिसत आहे. तेव्हा हा सर्व अत्याचार दूर करण्यासाठी दलितांनी काळोखाच्या बाहेर येणे गरजेचे आहे. भि.शि. शिंदे यांची लेखणी इतर दलित नाटककारांपेक्षा वेगळी कशी आहे, ते या नाटकावरून लक्षात येते.



Scanned with OKEN Scanner

प्रेमानंद गज्वी हे सुध्दा अतिशय महत्वाचे नाटककार आहे. प्रेमानंद गज्वी यांचे 'देवनवरी' (१९८०) व 'तनमाजोरी' (१९८३) हे गाजलेले नाटके आहोत. 'देवनवरी' या नाटकात गज्वी यांनी देवदासीची समस्या मांडलेली आहे. देवदासी म्हणजे देवाला सोडलेली देवासी समाजसमोर लग्न लावून दिलेली. स्वतचे स्वतंत्र अस्तित्व हरवून बसायला भाग पाडणारी समाजाचा मालकीची स्त्री म्हणजे देवदासी होय. देवधर्माच्या नावाखाली अनेक वाईट कृत्यांवर पांघरूण घालण्याचे काम या देवदासी प्रथेत दिसते. 'देवनवरी' या ज्वलंत प्रश्नाविषयी नाटकात गज्वीनी प्रकाशझोत टाकलेला दिसतो. 'देवनवरी' हे दाहक वास्तववादी नाटक आहे. हे नाटक अंतर्मुख होऊन विचार करायला लावले.

'तनमाजोरी' १९८३ हे सुध्दा प्रेमानंद गज्वींचे गाजलेले नाटक आहे. गज्वींनी या नाटकात आदिवासींच्या शोषणावर प्रखर प्रकाश टाकलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी माणसाला त्याच्या गुलामगिरीची जाणीव करून दिली की तो बंड करून उठतो. या विचारधारेवर हे नाटक आधारलेले आहे. नाटकातील खरा संघर्ष गण्या, इंगळे मास्तर आणि मालक यांच्यात आहे. नाटकात गण्या आपल्या पोराला पैशापायी मालकाकडे गहाण ठेवतो. गण्याच्या मुलाचे नाव वाश्या आहे. वाश्याला गहाण रहाणे आवडत नाही. परिस्थितीला शरण जाण्यासाठी दुसरा मार्ग नाही. वेठबिगार पध्दतीत कष्टाशिवाय पर्याय नसतो आणि कष्ट हे मृत्यूशिवाय सुटू शकत नाही.

प्रेमानंद गज्वी यांची सर्वात गाजलेली पुरस्कार प्राप्त एकांकिका म्हणजे 'घोटभर पाणी' ही होय. अस्पृश्यतेचा अत्यंत मूलगामी विषय तेवढीच सशक्त अभिव्यक्ती घोटभर पाण्यासाठी मरोत माणसं पण ते गाढवाला पाजलं तर क्रांती होते. वेदाध्यायी शंबूकाचा शिरच्छेद केला जातो आणि चार पायाचा रेडा क्रांतीकारी ठरतो हे क्रांतीचे वांझ अर्थ आणि संदर्भ देशाला रसातळाला घेऊन जात आहेत. 'वाटा पळवाटा' (१९८८) हे प्रा. दत्ता भगत यांनी लिहिलेले लक्षवेधक नाटक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारपृष्ठावर संपूष्ठ झालेल्या तीन पिढयांचा संघर्ष नाटकात आहे. दलित राजकारण आणि सामाजिक चळवळी संदर्भातील काही प्रसंग नाटकात आलेले आहेत. नाटकातील आशय व्यापक आहे. तो दलित व दलितेतर लोकांना विचार करायला लावणारा आहे. नाटकात तीन पिढया आहेत. पहिली पिढी इंग्रजांच्या काळातील निरक्षर तर दुसरी पिढी शिक्षण घेऊन घेऊन बौध्दीक कौशल्यावर चळवळीतील कार्यकर्त्यांची शिक्षणामुळे नोकरी व त्यामुळे आर्थिक स्थैर्य लाभलेली तिसरी पिढी स्वातंत्र्यानंतरच्या काळातली बेडर बंडखोर आणि लोकशाही मूल्यांवरील विश्वास हरवून बसलेली आहे. म्हणून या तीन



Scanned with OKEN Scanner

पिढ्यात संघर्ष निर्माण होतो. वडील अशिक्षित, मुलगा प्राध्यापक मुलाने ब्राम्हण मुलीशी लग्न केलेले अशा संदर्भात विविध पातळीवरचा संघर्ष हा नाटकात येतो. म्हणजे वाट सापडते पण त्यातून पळवाट शोधणे हे नाटकात दिसते म्हणून नाटकाचे शिर्षक अर्थपूर्ण वाटते.

वरील प्रतिनिधीक नाटकाशिवाय दलित साहित्यात अनेक लक्षवेधक नाटके आहेत. ही नाटके दलित चळवळीतून आकाराला आलेली दिसतात. डॉ. आंबेकरांचे विचार नाटकाद्वारे सामान्य वाचकापर्यंत पोहोचविणे हे मुख्य ध्येय दलित नाटककाराचे दिसते. आणि या नाटकाकाराला यशही आलेले दिसतात. यात भि.शि. शिंदे 'काळोखाच्या गर्भात' (१९७९), दत्ता भगत यांचे 'खेळीया' (१९८६), 'वाटा-पळवाटा' (१९८८) प्रेमानंद गज्वी यांचे 'देवनवरी' (१९८०), 'तममाजोरी' (१९८३), 'किरवंत' (१९९७), प्रकाश त्रिभवन यांचे 'थांबा रामराज्य येतंय' (१९८२), रूस्तम अचलखांब यांचे 'कैफियत', संजय पवार यांचे 'कोण म्हणतो टक्का दिला', रामनाथ चव्हाण यांचे 'बामनवाडा' (१९८१) या सारखी जॉनी मेश्राम यांचे 'अंधारयात्रा' अश्या नाटकांचा उल्लेख करता येईल. या नाटकातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार रूजविणे हे मुलभूत सूत्र नाट्यलेखनामागे दिसते.

**संदर्भ**


१. काळोखाच्या गर्भात, भि.शि. शिंदे (नाटक)
२. देवनवरी, प्रेमानंद गज्वी (नाटक)
३. तनमाजोरी, प्रेमानंद गज्वी (नाटक)
४. वाटा-पळवाटा, प्रा. दत्ता भगत (नाटक)
५. दलित साहित्य उदगम आणि विकास, डॉ. योगेंद्र मेश्राम
६. दलित साहित्याचा इतिहास, डॉ.म.सु. पगारे
७. दलित रंगभूमी आणि नाटय चळवळ, डॉ. मधुकर मोकाशी
८. दलित रंगभूमी, डॉ. भालचंद्र फडके




Scanned with OKEN Scanner

2017-18-Book DPP DPP

# स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्य आणि स्त्री

# स्वातंत्र्योत्तर हिन्दी साहित्य और नारी

# Post-Independence Indian English Literature And Women


-BOARD OF EDITORS-

Mr. Vilas S. Patil, Bhusawal

Dr. Shobha Shinde, Dhule

Dr. Subash P. Zanake, Bhusawal

Smt. Sandhya N. Rajput, Bhusawal

Dr. Girish S. Koli, Bhusawal



अथर्व पब्लिकेशन्स



Scanned with OKEN Scanner

अथर्व पब्लिकेशन्स

स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्य आणि स्त्री

स्वातंत्र्योत्तर हिन्दी साहित्य और नारी

**Post-Independence Indian English Literature And Women**

प्रकाशन क्रमांक: ५४४

© सुरक्षित

ISBN 13 : 978-97-87129-35-1

**प्रकाशक**

युवराज भटू माळी

**अथर्व पब्लिकेशन्स**

धुळे: १७, देवीदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे - ४२४००१. संपर्क: ९४०५२०६२३०

जळगाव: तळमजला, ओम हॉस्पिटल, अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, ढाके कॉलनी, जळगाव - ४२५००१.

संपर्क: ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७

ई-मेल: atharvapublications@gmail.com

वेबसाईट: www.atharvapublications.com

प्रथमावृत्ती: १७ फेब्रुवारी २०१८  अक्षरजुळवणी/मुखपृष्ठ: अथर्व पब्लिकेशन्स  मूल्य: ₹ ६५०/-

**Online पुस्तक खरेदीसाठी www.atharvapublications.com**

---

*Shri Saraswati Vidya Prasarak Mandal's Smt. Padambai Kapurchandji Kotecha Mahila Mahavidyalaya, Bhusawal*

*Organising - Two Day National Seminar (17th & 18th Feb. 2018)*

*Sponsored by - North Maharashtra University Jalgaon*

All rights are reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted in any form or by any means, electronic, mechanical, photocopying, recording or otherwise, withour prior written permission of the publisher.

***Disclaimer:*** The authors are solely responsible for the content of the papers compiled in this volume. The publishers or organizers do not take any responsibility for the same in any manner. Printed from the Camera ready copy provided by the editors.

---



Scanned with OKEN Scanner

# स्वातंत्र्योत्तर हिंदी कहानी – साहित्य में नारी

– प्रा. दिलीप पंडीत पाटील
पंकज कला महाविद्यालय
चोपडा, जि. जलगाँव

प्राचीन काल से ही भारतीय सभ्यता और संस्कृती में नारी का महत्व सर्वोतोपरि है। वाल्मीकि रामायण में लिखा है – 'यत्र नार्यस्तु पूज्यते, रमंते तत्र देवता' नारी को पुरातन काल से पूज्यनीय माना जाता रहा है। आधुनिक युग में बुहत सी लेखिकाओं ने नारी – चेतना का अलख जगाने का कार्य किया है, जिसमें चित्रा मुद्‌गल, कृष्णा सोबती, मन्नु भण्डारी, मृदुला गर्ग, नासिरा शर्मा, मंजुल भगत, उषा प्रियंवदा, मैत्रेयी पुष्पा, राजी सेठ, प्रभा दीक्षित, प्रभा सक्सेना, प्रभा खेतान, ममता कालिया, सुर्यबाला, पद्मा सचदेव, नमिता सिंह, शिवानी एव प्रभा शास्त्री के नाम महत्वपूर्ण है। इसके अलावा हिन्दी साहित्य में लेखको द्वारा भी नारी – चित्रण इसके संदर्भ मे किया गया है। १९ वीं सदी के उत्तरार्द्ध में काफी परिवर्तन आया, इसके संदर्भ में अनुपमा सिंह लिखती है – 'उन्नीसवी शती के उत्तरार्द्ध मे पितृ सत्तात्मक पुरुष प्रधान समाज के निरंकुश सामंती उत्पीडन के विरुध्द नई स्त्री चेतना का विकास हुआ।'

बीसवी सदी में नारी जागरण की लहर ने नारी की समस्याओं को भरपूर रोशनी दी है। नई पीढी की समस्या स्वतंत्र व्यक्तित्व की समस्या के रुप मे पढी – लिखी नारी अपने व्यक्तित्व के निर्माण के प्रति सावधान होती जा है। अब तो वह विवाह से लेकर जीवन के अनेक प्रश्नों पर स्वयं निर्णय लेती दिखाई दे रही है।

हिंन्दी साहित्य के स्वातंत्र्योत्तर हिंन्दी कहानी के विषयवस्तु में तेज गति से परिवर्तन दिखाई देता है। स्वातंत्र्योत्तर हिंदी कथा लेखन द्वद्व-संघर्ष से भरा पडा है। सामाजिक और राजनितिक परिस्थिती के कारण समस्याओं को जन्म मिला। वे ही कथा साहित्य का विषय बनी। हिंदी की प्रतिष्ठित कहानियो मे नारी के विविध रुप परिलक्षित हुए, उनमें कन्या, पत्नी, माता, विधवा-परित्यक्त, कामकाजी-वेश्या मुख्यतः है।

**सन्नाटा (महीप सिंह)**

साठोत्तरी कहानीकारो में प्रतिष्ठित कथा लेखन के रुप मे महीपसिंह जाने जाते है। सचेतन कहानी आन्दोंलन के हस्ताक्षर है। आलोच्य सन्दर्भ मे महीपसिंह की कहानी सन्नाटा विचारणीय है। आधुनिकता, पश्चिमी सभ्यता से आक्रान्त परिवार का वर्णन लेखक ने किया है 'हमें आपस मे बात किए हुए हप्तों गुजर जाते है। फ्लॅट मे एक-दुसरे की छाया देखकर हमें बस एक दुसरे के होने का अहसास होता है। अलग-अलग कमरेस, अलग-अलग बाथरुम, यहाँ तक कि टूथ पेस्ट भी अलग-अलग।' साठोत्तरी कहानी जगत में तेजी से हो रहे परिवर्तनों को सजग कहानीकार ने अपनी आँखो से देखा, उसकी गहन संवेदना ने यह महसूस किया कि रिश्ते-नाते, रक्त सबंध कितने करीब और दूर होते जा रहे है। सबंध बेमानी होते जा रहे है। माँ बेटी तक मे स्वेच्छाचार बढ गया है। सभी व्यक्तिगत स्वतंत्रता को लेकर परेशान है। किटी के संदर्भ माँ का कथन है 'किटी अब काफी सयानी हो गई है, अपनी शादी के बारे मे वह खूद सोचेगी। जब जहाँ, जिससे चाहेगी, शादी कर लेगी।' अपनी कन्या के बारे में स्वच्छंद विचार उसे उन्मुक्त आचरण की ओर ले जाते है। यह हमारे समाज की मर्यादा के विपरीत है।

**साँस – साँस पर पहरा बैठा (मालती जोशी)**

स्वातंत्र्योत्तर महिला कथाकारों में मालती जोशी का नाम उल्लेखनीय है। इस कहानी मे डॉक्टर कन्या की व्यथा-कथा है। आलोच्य कहानी मे डॉक्टर अजय और उनके माता-पिता की संवेदना के साथ एक लडकी मृणालिनी और उसके परिवार की रीति-नीती को चित्रित किया है। एक पढी-लिखी लडकी शादी के बाद स्वतंत्र रुप से अपने घर मे सोच भी नही सकती। मृणालिनी जैसी प्रतिभा संपन्न पुत्री अपने अर्थ संपन्न परिवार में घूटकर रह जाती है। उसे उपने भीतर अनेक बीमारियों की आशंका होने लगती है। उसका डॉक्टर मित्र कहता है 'उसकी तबियत को कुछ नही हुआ है आंटीजी, यह सिर्फ फ्रस्ट्रेशन है। कुछ न कर पाने की विवशता ने उसे बीमार कर दिया है। ऐसा न होता तो वह भी मजे में ताश खेलकर जिन्दगी गुजार सकती थी।'


ISBN : 978-97-87129-35-1

Scanned with OKEN Scanner

नारी की विवशता ही उसकी परेशानी है। उच्च शिक्षित होने के बावजूद भी वह मानसिक रुपसे बिमार है।

**चार बहनें शीस महल की (नासिरा शर्मा)**

नासिरा शर्मा की साठोत्तरी कथालेखन में एक विशिष्ट पहचान है। नासिरा शर्मा की कहानियों मे इंन्सानी पीडा की जीवंत अभिव्यक्ति प्रदान करने की क्षमता है। नासिरा जी के संवेदना के केंद्र में मनुष्य है। इनकी कहानियों में नारी के विविध रुपों को दर्शन होता है। आलोच्य कहानी मे नासिरा जी ने एक मुस्लिम परिवार की कथा को वाणी दी है। चुडीयों का व्यवसाय करनेवाली करीमन पुरे शहर में मशहूर है। उसका बेटा शरीफ की शादी रेशमा नायक युवती से होती है। उसके बाद उसे एक के बाद एक चार लडकियाँ होती है। लडका न होने के कारण वह उदास हो जाती है। करीमन लडकियों को आफत की बला समझती है। लेखिका बताती है की, आधुनिक समाज में लडकियों को बोझ समझा जाता है। करीमन को सलाह मिलती है की, वह शरीफ की दुसरी शादी कर दें। लेकिन शरीफ उसे इन्कार करता है। शरीफ की लडकियाँ स्कूल जाती है। किताब से ज्यादा उन लडकियों को दुनिया की समझ अधिक थी। लडकियाँ बोझ नही होती बल्कि वे तो सहायक होती है। इसलिए लेखिका ने आपत्ति के उन दिनों की चर्चा की है जब सांप्रदायिक दंगो से उनका दुकान जलकर खाक हो जाता है। पिता चिन्तामग्न है क्या करें? तब उनको यही लडकिंयाँ आत्मविश्वास के साथ समझाती है, अब्बू, क्या हम सब दुकान को सजाने मे आपकी मदद कर सकती है। क्या हम चूडियों की नई डिजाईन दे सकती है। मैने चुडियों का नाम रखा है – झंकार, धडकन, ईद का चाँद, प्यार का मौसम, गंगा की लहरे, दिवाली की रात। कुलमिलाकर कहानी नारी के अस्तित्व की ओर संकेत करती है।

**जिंदगी और गुलाब के फुल (उषा प्रियंवदा)**

साठोत्तरी कहानियोंकी लगभग सारी विषेशताएँ उषा प्रियंवदा की कहानियों में देखने को मिलती है। इनकी कहानी में निराशा, विद्रोह, दाम्पत्य सम्बधों की जटिलता, दिशाहिनता एवं सैक्स की भूख आदि का चित्रण मिलता है। इन्होंने नारी मन की सूक्ष्म अनुभूतियों एवं संवेदनाओं का कुशल चित्रण किया है। वर्तमान नारी सारी सीमाओं बन्धनों को तोडकर खुले आकाश में घूमना चाहती है। पुरुष के लिए नारी की यह स्थिती स्वीकार्य नही। इन सभी का चित्रण उषा प्रियंवदा उपनी कहानियों में बडी बारीकी से करती है। उनकी जिंन्दगी और गुलाब का फुल कहानी नितांन्त घरेलू वातावरण का चित्रण करती है। घरमें कामकाजी लडकी का वर्चस्व बढता है। वैसेही वह घर का सारा कारोबार अपने हाथ में लेना चाहती है। भाई सुबोध बेराजगार है। इसलिए वह घरमें भी बेकार है। परिवार का दैनिक दायित्व का निर्वाह तो पुत्री वृन्दा पुरा कर ही है। वह घर की जिम्मेदारी के प्रति सजग है। भाई–बहन के संघर्ष को लेखिका रेखांकित करती है – 'पहले अपनी चीन वृन्दा के कमरे मे देख उसे कुछ अटपटा लगता था पर अब अभ्यास्त हो गया था। यद्यपि उसका पुरुष हृदय वृन्दा की सत्ता स्वीकार न कर पाता था। बेकारी व्यक्ति को निरीह बना देती है।' लेखिका संकेत करती है की बेटा–बेटी को समान अस्तित्व के रुप मे स्वीकार करना चाहीए। सिर्फ बेटा होने से ही उसे विशेष अधिकारी प्राप्त नही समझना चाहिए। बेटी भी उसी माता की कोख से जन्म लेती है।

**गूँगी (जगदीशचंन्द्र)**

गूँगी जगदीशचंन्द्र जी की प्रसिध्द कहानी है। गूँगी एक मातृहीन लडकी है। वह गूँगी नही है, बोलती है। किन्तु कम बोलती है। वह दिन–रात मशीन की तरह काम करती रहती है और केवल उस समय बोलती है जब बिना बोले काम नही चलता है। इसका उसे ईनाम मिला कि सब लोग उसे गूँगी कहकर पुकारने लगे। पिता की कठोरता के कारण गूँगी कुंठित हो गई। उसके सपने नष्ट हो गए। मातृहीन कन्या की दुर्दशा का बडा कारण उसका बाप बनता है। गूँगी साठोत्तरी समाज की दारुण कहानी है। प्रस्तुत कहानी की संवेदना में अनाथ कन्या के अनारक्षित–असुरक्षित भविष्य का स्वरुप दुष्टिगोचर होता है।

वर्तमान समय में शिक्षा के प्रसार ने नारी सोच का दायरा बढा है। वह अपने हित–अहित को लेकर सचेत हो गई है। स्वातंत्र्योत्तर हिंदी कहानियों में नारी के विविध आयाम दिखाई देते है। कही पर ममता भर पुत्री है तो कही पर उपेक्षित, कही पर घर का दायित्व निभानेवाले तो कही पर शिक्षित होकर भी न्याय के लिए खडी है। कुलमिलाकर स्वातंत्र्योत्तर कहानी नारी मन की संवेदनाओं को उजागर करती है।

**संदर्भ**


१. महिला सशक्तीकरण साहित्यिक दृष्टि – संपा. डॉ. राजेश गर्ग

२. प्रतिनिधी कहानियाँ – सं. हिन्दी विभाग, एस.एन.डी.टी. वूमन यूनिवर्सिटी, मुंबई

३. दस प्रतिनिधी कहानियाँ – मालती जोशी


४. स्वातंत्र्योत्तर हिन्दी कहानी – सं.डॉ. रामकुमार गुप्त




Scanned with OKEN Scanner

ISBN 978-93-87129-29-0

# Recent Political Development in India



Prof. A. B. Mahajan

Dr. A. G. Jaiswal

Prof. E. S. Gedam

अथर्व पब्लिकेशन्स

Scanned with OKEN Scanner

38. भारताच्या परराष्ट्र धोरणावरील जागतिकीकरणाचा परिणाम ...274
*- प्रा. अप्पासाहेब एस. गमे*

39. फुले, शाहू व आंबेडकरकालीन महाराष्ट्राचा राजकीय स्थितीचा अभ्यास ..............279
*- प्रा. डॉ. सुरेंद्र अंबर मोरे, प्रा. अशोक सुखदेव राठोड*

40. नक्षलवाद : भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसमोरील प्रमुख आव्हान ..........................284
*- डॉ. दत्तात्रय चंद्रकांत वाबळे*

41. भारतीय पक्षपद्धती ..........................................................................288
*- प्रा. डॉ. उमाकांत राठोड*

42. मानवाधिकार आणि सामाजिक न्याय : संकल्पना ................292
*- श्रीमती मिरा शिंदे, डॉ. वंदना माहुरे*

43. नवे आर्थिक धोरण आणि समाजवाद...................................298
*- डॉ. प्रा. पी. यु. नेरपगार, श्री. कांतीलाल दाजभाऊ सोनवणे*

44. नक्षलवाद : समस्या आणि आव्हाने........................................302
*- प्रा. डॉ. सुरेंद्र अंबर मोरे*

45. भारतीय संघराज्यातील केंद्र–राज्य संबंध................................311
(विशेष संदर्भः १९८९–२०१६ या काळातील कलम ३५६ चा प्रयोग)
*- प्रा. डॉ. ढोबळे डी. बी*

46. मानवी हक्क : सामाजिक न्यायाची वास्तवता .........................323
*- प्राचार्य डॉ. मनोहर तुकाराम पाटील*

47. कॉ. श्रीपाद डांगे यांच्या राजकीय विचारांची समर्पकता........331
*- संजय पाटील*

48. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विकासातील योगदान ...........338
*- प्रा. डॉ. सुरेंद्र मोरे, प्रा. विनय वाघ*

49. भारतातील नक्षलवादी चळवळ : सद्य:स्थिती आणि आव्हाने ........................344
*- प्रा. भरत वसंतराव जाधव*

50. भारताच्या भवितव्याविषयी डॉ. आंबेडकरांचे विचार.............348
*- डॉ. राजेंद्र बंडू शेजुळ*



51. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राजकारणाची मीमांसा...................354
*- प्रा. शरद बाबुराव सोनवणे*

52. फुले–शाहू–आंबेडकर यांच्या राजकीय विचारांची सद्यस्थिती : एक अभ्यास .......359
*- प्रा. गणेश भिला महाजन, प्रा. डॉ. नितीनकुमार माळी, डॉ. ए. टी. पाटील, डॉ. एम. आर. वैशंपायन*

53. महात्मा गांधी यांचे ग्रामस्वराज्य विषयक विचार व प्रासंगिकता...................365
*- प्रा. संजय किशनराव भालेराव*

54. भारतीय राजकारणात भारतीय जनता पार्टीची प्रबळ पक्ष पद्धतीकडे होणारी वाटचाल.......374
*- प्रो. डॉ. दत्तात्रय मुकूंद टेकाडे, सुनिल मच्छिंद्र राजपूत*

55. राज्याच्या राजकारणातील पक्षीय राजकारणाचे बदलते स्वरुप......................382
*- प्रा. प्रशांत देशपांडे*

56. जागतिकीकरण आणि उदारीकरण परिणाम व भारतासमोरील आव्हाने .......................393
*- प्रा. श्रीमती छाया दत्तात्रय डुकरे*

57. फुले–शाहू–आंबेडकरांचे शेतकऱ्यांच्या आर्थिक सुधारणा संदर्भात आधुनिक विचार......400
*- प्रा. संदिप रामदास निकम, श्रीमती तृप्ती महाजन*

58. आदिवासींच्या समस्यांबाबत महाराष्ट्र शासनाची भूमिका .......406
*- डॉ. शशीकांत साबळे*

59. आदिवासी समुदायाचा विकास आणि आम आदमी पक्षाची भूमिका .................................417
*- श्री. शरद तुकाराम पाटील*

60. भारतीय समाजव्यवस्थेपुढील नक्षलवादाचे आव्हान ...............423
*- डॉ. सचिन महादेव पाटील*

61. विकास प्रशासनात माहितीच्या अधिकाराची भूमिका ............433
*- प्रा. प्रतिभा टावरी*



Scanned with OKEN Scanner

भरलेल्या अस्पृश्य परिषदेच्या अध्यक्ष पदावरुन बोलतांना धर्मांतराची घोषणा केली. तेव्हा त्यांनी असे उद्‌गार काढले की, दुर्दैवाने मी हिंदू म्हणून अस्पृश्य जातीत जन्मलो असलो तरी मी मरतांना मात्र मी हिंदू म्हणून मरणार नाही. त्यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे बौद्ध धर्माची दिक्षा असंख्य अनुयायांसह घेतली. त्यांनी बहिष्कृत भारत व मुकनायक या नियत कालीकातून आपल्या झोपलेल्या समाजास जागे केले. शिका, संघटीत व्हा व संघर्ष करा हा संदेश त्यांनी लोकांना दिला. त्यांनी जगातील अनेक देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करुन भारतासाठी स्वतंत्र राज्यघटना लिहीण्याचे कष्टमय काम केले. २ वर्ष ११ महिने १८ दिवसात राज्यघटनेचे काम पुर्ण झाले. त्यातून स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्यायाचा संदेश लोकांपर्यंत पोहचला.

संदर्भ

१. प्रा. राऊत गणेश, महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, डायमंड पब्लीकेशन, पुणे
२. गायकवाड जयदेव, संविधान सभेत डॉ. आंबेडकर, पद्मगंधा प्रकाशन, पुणे
३. डॉ. पाटील वा. भा., भारतीय राज्यघटना, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव
४. कुलकर्णी स्वाती, मानवी हक्कातील मुलभूत संकल्पना, प्रकाशक डॉ. प्रकाश अतकारे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
५. कसबे रावसाहेब, डॉ. आंबेडकर आणि राज्यघटना, सुगावा प्रकाशन, पुणे
६. डॉ. वाघमारे बी. एस., मानवविकास संसाधन व मानवाधिकार, पिअरसन प्रकाशन, नवी दिल्ली
७. डॉ. भोळे भा. ल., भारताचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे आणि कंपनी पब्लीशर्स, नागपुर
८. प्राचार्य डॉ. देवरे पी. डी., संपादक मानवाधिकार – २००५
९. कुलकर्णी बी. वाय., भारतीय राजकीय विचारवंत, विद्याभारती प्रकाशन, लातुर



# कॉ. श्रीपाद डांगे यांच्या राजकीय विचारांची समर्पकता

संजय पाटील
सहा. प्राध्यापक, राज्यशास्त्र,
पंकज कला महाविद्यालय, चोपडा.

## प्रस्तावना

औद्योगिक क्रांतीनंतर कामगार आणि भांडवलदार या दोन नवीन वर्गांनी निर्मिती झाली. सुरुवातीच्या काळात नफेखोर वृत्तीमुळे कामगारांचे श्रमिक व आर्थिक शोषण होत होते. कामगारांना न्याय मिळत नसल्याने कामगार व भांडवलदार वर्गात वर्ग कलहाला सुरुवात झाली. कार्लमार्क्सने या पार्श्वभूमीवर जगातील कामगारांना एकत्र येण्याचे आवाहन केले होते. कामगारांवरील अन्याय व शोषण थांबवण्यासाठी कामगारांनी रक्तरंजित क्रांती करावी आणि भांडवलदारशाही संपुष्टात आणून कामगारांचे राज्य प्रस्थापित करावे. वर्गविहीन समाज, शोषणविरहीत समाज निर्माण करावा अशा साम्यवादी विचारांची मांडणी केली. या विचारांचा प्रसार जगभर होत होता.

पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस निर्माण झालेल्या राजकीय व आर्थिक परिस्थितीमुळे भारतात डाव्या (साम्यवादी) विचारसरणीचा उदय झाला. १९१७ च्या रशियातील क्रांतीनंतर भारतात मार्क्सवाद आला आणि त्याचा प्रसार होऊ लागला. भारतातील औद्योगिक क्रांतीमुळे नव्या व्यवसायांची निर्मिती झाली. त्यातून कामगारांचे शोषण, उपासमारी, बेकारी ह्या समस्या भारतात निर्माण झाल्या होत्या. भारतातील एस.एम.जोशी, जयप्रकाश नारायण, ना.ग.गोरे या लोकांवर साम्यवादाचा प्रभाव पडला होता. पण त्यांना भारताच्या संदर्भात लोकशाही समाजवादी विचार अधिक उपयुक्त व पोषक वाटत होता. त्यामुळे त्यांनी समाजवादी विचारांचे समर्थन केले. याच काळात लेनिनच्या नेतृत्वाखाली झालेल्या साम्यवादी क्रांतीने भारतातील बुद्धीजीवी व्यक्तींवर साम्यवादाचा प्रभाव पडला. त्यात कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे यांचे नाव अग्रभागी घेतले जाते. याच प्रभावातून त्यांनी भारतात १९२५ मध्ये साम्यवादी पक्षाची स्थापना केली. भारतातील कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी मार्क्सवादाशिवाय पर्याय नाही हे त्यांनी जाणले. त्यासाठी त्यांनी साम्यवादी विचार अखंडीतपणे जोपासला.

स्वातंत्र्योत्तर भारतात देखील सत्तेची अपेक्षा न बाळगता विरोधी पक्षाची भूमिका प्रभावीपणे निभावली व कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. कामगार संघटना व कामगार आंदोलनाचे नेतृत्व करुन कामगारांना न्याय मिळवून दिला. कामगार हा उपेक्षित वर्ग न राहता त्याला भांडवलदाराच्या निर्णय प्रक्रीयेत सहभागी करण्यासाठी कॉम्रेड डांगे यांचे योगदान फार मोलाचे आहे. त्यादृष्टिने कॉ.श्रीपाद डांगे यांच्या राजकीय विचारांची समर्पकता अभ्यासण्याच्या हेतूने प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी करण्यात आली आहे.

**उद्दीष्टये**

» कॉ.श्रीपाद डांगे यांच्या राजकीय विचारांचा अभ्यास करणे.

» कॉ.डांगे यांच्या बहुआयामी कार्याचा आढावा घेणे.

» कॉ.डांगे यांच्या राजकीय विचारांची समर्पकता अभ्यासणे.

**राज्यघटना निर्मिती व कॉ.डांगे**

स्वातंत्र्यानंतर भारताची स्वतंत्र राज्यघटना असावी यासाठी डॉ.राजेंद्र प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली घटना समितीची स्थापना करण्यात आली होती. राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर होते. राज्यघटना संपूर्ण देशासाठी असल्याने राज्यघटनेचा मसुदा तयार करताना चर्चा करण्यासाठी राज्यनिहाय सर्वपक्षीय सभांचे आयोजन केले जात होते. १९४९ मध्ये राज्यघटनेवर चर्चा करण्यासाठी मुंबई येथे सर्वपक्षीय चर्चा झाली. कॉ.श्रीपाद डांगेचा त्यात सहभाग होता. राज्यघटनेमध्ये सार्वभौम गणराज्याची स्थापना, वयस्कर मताधिकार, सांसदीय लोकशाही, मूलभूत अधिकार व जबाबदार राज्य पद्धती इ. सूचना कॉ.डांगे यांनी केल्या.[१] डॉ. डांगेनी अभ्यासपूर्ण पद्धतीने सूचना मांडल्या होत्या. भारतात जबाबदार राज्यपद्धती व सांसदीय लोकशाही निर्माण व्हावी यासाठी ते आग्रही होते. पुढे अशीच राज्यघटना अमलात आली. हे कॉ. श्रीपाद डांगेच्या सूचनांचे यश होते.

**घटनादुरुस्ती व कॉ.डांगे**

बदलत्या काळानुसार लोकशाही व्यवस्था बळकट व्हावी या हेतूने राज्यघटनेत बदल करण्यासाठी घटनादुरुस्तीची तरतूद करण्यात आली आहे. कॉ.श्रीपाद डांगे यांनी घटनादुरुस्ती म्हणजे 'प्रगतीचे पुढचे पाऊल' असल्याने काळानुरुप त्यात बदल करावे, असे मत मांडले.

भारतीस राज्यघटनेच्या प्रस्तावनाात 'सार्वभौम, लोकशाही, प्रजासत्ताक' याऐवजी 'सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, प्रजासत्ताक' हा बदल सुचविला. त्यास 'समाजवाद' शब्दाचा स्वीकार करण्यासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्ष व कॉंग्रेस यांनी पाठींबा दिला होता. या संदर्भात कॉ.डांगे म्हणतात, घटनेच्या



प्रस्तावात समाजवाद स्थापन करण्याचा पुकारा करणारी जी दुरुस्ती सुचवली गेली आहे, ती सर्वात महत्वाची आहे. घटनेतल्या प्रस्तावात केवळ बदल करुन शासन संस्थेचा ढाचा बदलेल व श्रमजीवी वर्गाचे समाजवादाचे स्वप्न साकार होईल, असा भ्रम कोणीच बाळगत नाही. पण तरीसुद्धा दुरुस्तीमुळे ह्या वर्गाचे समाजवादाकरिता चाललेल्या संघर्षातील स्थान अधिक मजबूत होईल.[२]

कॉ.डांगे यांनी समाज व्यवस्थेतील संपत्तीचे केंद्रीकरण होवू नये यासाठी समाजवादाची आवश्यकता असल्याचे स्पष्ट केले होते. समाजवादाविषयी पंडीत नेहरुंच्या समाजवादाचे तत्वज्ञान कॉ.डांगेनी मान्य केले. पंडीत नेहरु समाजवादाविषयी म्हणतात, ह्या जगातले व देशातले यक्ष प्रश्न सोडविण्याची गुरुकिल्ली समाजवाद हीच आहे. देशातील गरिबी व बेकारी संपविण्याकरिता, भारतीय जनतेचा आर्थिक व सामाजिक ऱ्हास थांबविण्याकरिता समाजवादाशिवाय दुसरा पर्याय नाही.[३] समाजवादी समाजव्यवस्थेचे स्वप्न पाहणाऱ्या कॉ.श्रीपाद डांगे यांच्यासह भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांचे हे यशच होते. शेवटी १९७६ मध्ये ४२ व्या घटनादुरुस्तीने भारतीय राज्यघटनेच्या प्रास्ताविकेत 'समाजवादी' व 'धर्मनिरपेक्ष' या दोन तत्वांचा समावेश करण्यात आला.

**कॉ.श्रीपाद डांगेची चीन युद्धातील भूमिका**

रशिया व चीन या दोन साम्यवादी राष्ट्रात असलेल्या विचारसरणीनुसार भारतातील कम्युनिस्ट पक्षातही उजवा व डावा अशा दोन गटात विभागणी झाली होती. रशियावादी उजवे व चीनवादी जहाल–डावे अशी विचारसरणी भारतीय कम्युनिस्ट नेत्यात रुजली होती. चीनच्या भारतावरील आक्रमणानंतर चीनवादी डावा गट कॉ.नंबुद्रीपाद, रणदिवे इ. नेते यांनी चीनची बाजू घेतली. त्यामुळे या काळात देशात कम्युनिस्टांविरोधी वातावरण निर्माण झाले होते. कॉ.श्रीपाद डांगेनी उघडपणे चीनच्या कृत्याचा निषेध केला. चीनचा हल्ला झाल्यावर पक्षापुढे मोठा खडतर प्रसंग निर्माण झाला होता. कॉ.श्रीपाद डांगे यांनी कम्युनिस्ट कधी आक्रमण करीत नाही, अशी ग्वाही चीनबद्दल दिली होती. त्यावेळी चीन भारतावर आक्रमण करणार नाही, असा त्यांचा समज होता.४ चीनने भारतावर आक्रमण करुन कम्युनिस्टांच्या अंगी असलेले मूल्य मोडीत काढले. कॉ.डांगेचा समज चुकीचा असल्याचे या आक्रमणावरून सिद्ध झाले.

चीनच्या भारतावरील आक्रमणानंतर भारतीय राष्ट्रवादाची जपणूक केली. लोकमान्य टिळकांच्या राजकीय तत्वज्ञानावर कॉ.श्रीपाद डांगे यांची राजकीय विचारांची, क्रांतिकारी व राष्ट्रवादी विचारसरणीची जडणघडण झाली होती. या संदर्भात कॉ.डांगे म्हणतात, लोकमान्यांकडून राजकारणाची दिक्षा घेत–घेतच मी पुढे गेलो. त्यांच्यापासून मी राष्ट्रवाद तर शिकलोच, पण राष्ट्रवाद हा कामगार



Scanned with OKEN Scanner

...आधारला पाहिजे हे ही शिकलो.[५] कॉ.श्रीपाद डांगेनी राजकीय कार्याची ...लोकमान्य टिळकांकडून मिळाली होती. त्यांनी राष्ट्रवाद आणि समाजवाद ...च्यात भेद केला नाही. चीनने भारतावर आक्रमण केल्यानंतर कॉ.श्रीपाद डांगे राष्ट्रवादा संदर्भात म्हणाले, ''माझा राष्ट्रवाद या राष्ट्रावर कोणी बाहेरुन हल्ला केला तर मग तो चीन असो, रशिया असो, इंग्लड असो की, अमेरिका असो, त्याच रक्षण करणे त्याला राष्ट्रवाद म्हणतात. कोणी आरोप करतात आम्ही रशियाचे एजंट, कोणी म्हणतात आम्ही चीनचे एजंट, आम्ही मात्र स्वत:ला मानतो हिंदुस्थानचे एजंट.''[६] यावरून पक्ष कोणताही असो, मात्र स्वत:च्या देशाविषयी असलेली आत्मियतेची व देशप्रेमाची भावना म्हणजे राष्ट्रवाद, हे कॉ.श्रीपाद डांगेनी आपल्या कृतीतून सिद्ध केले. कम्युनिस्टांना अराष्ट्रीय व राष्ट्रद्रोही ही लावलेली विशेषणे कॉ.श्रीपाद डांगेनी मोडीत काढली.

सत्याग्रही समाजवादाच्या तत्वज्ञानाचे उद्गाते आचार्य जावडेकर यांनी म्हटले होते की, ''समाज सत्तावादी कम्युनिस्ट पुढारी जर लोकसत्तेला विरोध करण्याची वृत्ती सोडून देऊन आपणास अभिप्रेत असणारा समाजवाद आपण लोकसत्ताक मार्गानेच आणणार आहोत, असे जाहीर करतील, तर हिंदी राष्ट्रवाद फारच थोड्या काळात समाजवादी बनेल.''[७] जावडेकरांच्या मते, भारतात लोकशाहीला समाज सत्तावादाची वैचारीक बैठक निर्माण करण्याचे काम कॉ. श्रीपाद डांगे सारखे कम्युनिस्ट पुढारी करित होते.

चीनच्या भारतावरील आक्रमणानंतर तर त्यावेळच्या परिस्थितीची चिकीत्सा कॉ.डांगेनी केली. ते म्हणतात, ''क्युबाच्या प्रश्नावर सोवियत युनियन आणि अमेरिकेचे चांगलेच जुंपले आहे. त्या दोघात आता घनघोर युद्ध लागेल आणि आता आग्नेय आशियात मन मानेल तसे वागता येईल, ही चिनी नेत्यांची अपेक्षा होती आणि म्हणून त्यांनी भारतावर हल्ला चढविला.''[८] ही गोष्ट कॉ.डांगेनीच प्रथम दाखवून दिली. या हल्ल्यानंतर कॉ.डांगे यांनी आपल्या व्यवहारवादी धोरणाचा अंगीकार केला. चीनचा निषेध करणारे पत्रक पक्षाध्यक्ष या नात्याने काढले होते. मात्र नंबुद्रीपाद गटाने चीनवादी धोरणाचा पुरस्कार केला. प्रसार माध्यमांनी कम्युनिस्ट विरोधी प्रचार केला. त्यामुळे कॉ.श्रीपाद डांगेचे प्रयत्न काही प्रमाणात यशस्वी झाले.

### भारत-चीन युद्धात कॉ.डांगेची भूमिका

चीनच्या आक्रमणानंतर भारतीय कम्युनिस्ट पक्षातील नंबुद्रीपाद गटाने चीनवादी धोरणाला पाठींबा दिला होता. तर प्रसारमाध्यमे व कॉ.श्रीपाद डांगे यांचा उजव्या गटाने चीनी आक्रमणाचा उघडपणे विरोध करून भारताच्या भूमिकेस पाठींबा जाहीर केला होता. भारतीय कम्युनिस्ट पक्षात राजकीय



धोरणात उघडपणे मतभेद निर्माण झाले होते. राष्ट्रभक्त म्हणून कॉ.श्रीपाद डांगेनी कम्युनिस्ट चीन विरुद्धच्या लढाईत भूमिका मांडली. कॉ.डांगे विरुद्ध जहाल गट हा संघर्ष तीस वर्षापासून पक्षांतर्गत पातळीवर सुरु होता. त्या संघर्षाने सीमा गाठली होती. नेहमी पक्षहितासाठी माघार घेणारे कॉ.श्रीपाद डांगे यांनी राष्ट्राहिताला महत्त्व दिले मात्र माघार घेतली नाही.

चीनच्या आक्रमणानंतर आंतरराष्ट्रीय पातळीवर रशियाचे धोरण स्पष्ट केले नव्हते. चीन हा आमचा भाऊ आहे व भारत हा आमचा मित्र आहे. भाऊ व मित्र यांच्यातील संघर्ष दुर्दैवी आहे.[९] त्यामुळे रशियाने एवढीच भूमिका घेतली होती. रशियाचे संबंध दोन्ही देशांशी चांगले होते. कॉ.डांगेनी सोवियत संघाचे भारतातील राजदूत बेनिडिक्टोव्ह यांच्याकडे सोवियत पक्षाचे सरचिटणीस क्रुश्चेव्ह यांना भारत-चीन युद्धात आपली भूमिका व्यक्त करणारे पत्र लिहीले. तेव्हा नेहरुंचा डांगेवरील विश्वास वाढला होता.

नेहरुंनी कॉ.डांगेना आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट नेत्यांना भारताची न्याय्य भूमिका पटवून द्यावी अशी विनंती केली. कॉ.डांगे कागदपत्रांसह मॉस्कोला गेले. तिथे क्रुश्चेव्ह व टिटो यांची त्यांनी भेट घेतली व भारत सरकारची भूमिका समजावून दिली. त्यानंतर लगेच सुप्रिम सोवियतमध्ये खुश्चेव यांनी भारताच्या भूमिकेला पाठींबा जाहीर केला. मार्शल टिटोनेही सुप्रिम सोवियतला संबोधित करतांना भारताला आपला पाठींबा दिला.[१०] कॉ.श्रीपाद डांगेनी समाजवादी नेत्यांना भारताची भूमिका यशस्वीपणे समजवून दिली. शिवाय आंतरराष्ट्रीय स्तरावर कॉ.डांगेचे राजकीय वजन वाढलेले होते याची प्रचीती यातून येते.

आपल्या पक्षांतर्गत विरोधाला न जुमानता आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीसमोर माओवादी विचारांचे पितळ उघड करण्याचे काम कॉ.श्रीपाद डांगेनी केले. या काळात कॉ.डांगेनी राजकीय धोरणाची मांडणी केली. कम्युनिस्टांचे स्वदेशावर प्रेम असते. आपला देश स्वतंत्र रहावा, दुसऱ्या एखाद्या देशाचा अंमल तेथे चालू नये, त्यांच्या पायदळी तो तुडविला जाऊ नये, अशीच कम्युनिस्टांची इच्छा असते. त्यांच्याही मनात देशाभिमानाची ज्योत तेवत असते.[११] राष्ट्र संरक्षणासाठी राष्ट्रवादाशी एकरूप राहिले पाहिजे. राष्ट्र संरक्षणासाठी प्रसंगी पाठींबा देणे क्रमप्राप्त होते. या धोरणांचा स्वीकार कॉ.श्रीपाद डांगेनी केला. यालाच 'डांगे लाइन' म्हटले गेले. समाजवादी देश कधीही आक्रमण करीत नाही. चीन हा कम्युनिस्ट देश असल्याने तो आक्रमण करू शकत नाही ही कॉ. रणदिवेंच्या समजूत होती. चीनच्या आक्रमणानंतर तो कॉ.रणदिवेंचा गैरसमज असल्याची जाणीव कॉ.श्रीपाद डांगेनी रणदिवेंना करून दिली. कॉ.श्रीपाद डांगे यांनी आपल्या राजकीय तत्वाशी भारत-चीन युद्धावेळी कोणतीही तडजोड



Scanned with OKEN Scanner

केली नाही. आंतरराष्ट्रीय नेतृत्वाला भारताच्या भूमिकेचे समर्थन करण्यासाठी कागदपत्रांची पुरावे सादर केले. केवळ पक्षाच्या आंतरराष्ट्रीय तत्वासोबत वाहवत न जाता देशहिताचा विचार योग्यवेळी करुन नेहरु सरकारला पाठींबा देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय कॉ.श्रीपाद डांगेनी घेतला.

**उत्कृष्ट संसदपटू कॉ.श्रीपाद डांगे**

१९५७-१९६२ या काळात कॉ.डांगे यांनी आपल्या वर्क्तृत्वाच्या जोरावर स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली होती. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या माध्यमातून कॉ.डांगे संसदेत पोहोचले होते. या काळात संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील कामगार, मध्यमवर्गीय यांनी कॉ.डांगेवर टाकलेला विश्वास सार्थकी लावला. त्यांची माहितीपूर्ण व अभ्यासपूर्ण भाषणांतून सरकारच्या धोरणांवर व भांडवलदारांच्या कामगारविरोधी कृत्यांवर देशाच्या सर्वोच्च सभेत आपली मते निर्भीडपणे व विधायक पद्धतीने मांडली होती. त्यामुळे डांगेप्रती सभागृहाच्या प्रत्येक सदस्याला आदर होता. पंडीत नेहरु हे तत्कालिन पंतप्रधान होते. त्यांच्याविषयी रोझा देशपांडे म्हणतात, डांगे लोकसभेत निवडून येताच पं.नेहरुंनी आपल्या सेक्रेटरीला सांगून ठेवले होते की, डांगे बोलायला उभे राहिले की मला सांगा. डांगेचे भाषण त्यांनी सहसा चुकविले नाही.[१२] पंडीत नेहरुंना देखील कॉ. डांगे यांच्या अभ्यासपूर्ण भाषणाने वेड लावले होते. कॉ.डांगे केवळ टीका करीत नसत तर सूचना देखील करीत. त्यामुळे प्रत्येक खात्याचे मंत्री आपल्यावरील टीका व सूचना लक्षपूर्वक ऐकत होते. कॉ.डांगेनी १९५७ ते १९६१ या पाच वर्षाच्या काळात लोकसभेत महत्वाच्या विषयांवर ३० भाषणे केली होती. त्यात त्यांनी जनहिताच्या बाजूने आवश्यक बदल सुचविले होते. सरकारने कॉ. डांगेच्या सूचनांचा विचार करून आवश्यक तेथे बदलही केले होते. सरकारची टर उडविण्याची विनोदी मार्मिक शैली, अनेक भाषांवरील प्रभुत्व, हजरजबाबीपणा, अभ्यासूवृत्तीने विशिष्ट्य शैलीत भाषण करण्याची कला या सर्व गुणांमुळे कॉ. श्रीपाद डांगे उत्कृष्ट संसदपटू म्हणून नावलौकिक मिळविला होता.

**निष्कर्ष**

» विधानसभा व लोकसभा सदस्य असताना कॉ.श्रीपाद डांगे यांनी सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडली. सभागृहात मांडल्या जाणाऱ्या विविध विषयांच्या चर्चेत त्यांनी सक्रीय सहभाग घेत असून आजच्या आधुनिक काळात सभागृहात जनतेचे प्रश्न मांडण्यासाठीही काही नेत्यांकडून भ्रष्टाचार केला जात असल्याचा प्रकार उघडीस आला आहे. तेव्हा नि:स्वार्थी भावेनेने जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी असलेली तळमळ हा कॉ.डांगेचा गुण आधुनिक काळातील भ्रष्टाचारी नेत्यांना निश्चित समर्पक आहे

» कॉ.डांगे यांनी राज्यघटने निर्मिती वेळी सार्वभौम गणराज्याची स्थापना, वयस्कर मताधिकार, मूलभूत अधिकार व जबाबदार राज्य पद्धती यासारख्या सूचना केल्या. लोकशाही बळकटीकरणाच्या दृष्टीने या सूचना आजही समर्पक आहेत.

» भारत-चीन युद्धावेळी कॉ.श्रीपाद डांगे यांनी चीनी कम्युनिस्टांना निर्भीडपणे व प्रखरपणे विरोध केला. यातून त्यांच्या अंगी देशप्रेम व राष्ट्रनिष्ठा दिसून येते.

» कॉ.श्रीपाद डांगे उत्कृष्ट संसदपटू होते. संसदेतील त्यांचे भाषण अभ्यासपूर्ण व विशिष्ट्य भाषा शैलीने युक्त असे. त्यामुळे सरकारला चुकीच्या धोरणावर केवळ टीका न करता अभ्यासपूर्ण सूचना देत. तत्कालिन पंतप्रधान पंडीत नेहरुंसह अनेक जेष्ठ नेते त्यांचे भाषण ऐकण्यासाठी आवर्जून उपस्थित राहत असत. हा आदर्श आजच्या संसद सदस्यांना उत्तम संसदपटू होण्यासाठी व अभ्यासपूर्ण भाषणे करण्यासाठी निश्चितच प्रासंगिक आहे.

**संदर्भ**


१. दै. दिव्य मराठी, ६ सप्टेंबर २०१६, पृष्ठ क्र.६
२. कॉ.डांगे, एस.ए. : बदलणारे जग, आपला महान देश आणि कामगार वर्ग, ऑल इंडिया ट्रेड युनियन कॉंग्रेस, महाराष्ट्र राज्य कौन्सिलचे प्रकाशन, ऑक्टोबर १९७६, पृष्ठ क्र. ४५
३. गडकरी, ॲड. जयंत : घटनादुरुस्ती एक धावते समालोचन, महाराष्ट्र कॉन्सीलचे प्रकाशन, मुंबई १९७६, पृष्ठ क्र.३
४. सुर्वे, नारायण (संपादक) : कॉ.डांगे: राजकारणातील वादळ, शलाका प्रकाशन, मुंबई, ऑक्टोबर १९८८, पृष्ठ क्र.१२१
५. कित्ता : पृष्ठ क्र.११४
६. कित्ता : पृष्ठ क्र.११४
७. दैनिक केसरी १०.१०.१९७४
८. उपरोक्त क्रं.४, पृष्ठ क्र.६५
९. डॉ.चौसाळकर, अशोक : कॉ.श्रीपाद अमृत डांगे, कॉ.गोविंद पानसरे अमृत महोत्सव समिती, कोल्हापूर, मे २०११. पृष्ठ क्र.३३२
१०. डांगे, उषाताई : पण ऐकत कोण?, विचार भारती प्रकाशन, मुंबई. सप्टेंबर २००३,,पृष्ठ क्र.२३९
११. रणदिवे, बाबुराव : कॉम्रेड डांगे, अभिनव प्रकाशन, मुंबई, १९८९, पृष्ठ क्र.१६४
१२. देशपांडे, रोझा व देशपांडे, बानी : एस.ए.डांगे - एक इतिहास, विचार भारती प्रकाशन, मुंबई, ऑक्टोबर २०१६,पृष्ठ क्र.४८०.







Scanned with OKEN Scanner

SKP 2017-18

ISBN NO: 978-93-83619-15-3



ONE DAY NATIONAL SEMINAR ON

# INDO-PAK RELATIONS : HISTORICAL & POLITICAL PERSPECTIVES

December- 22, 2018

2017-18 -SKP

## SEMINAR PROCEEDINGS

Editors
Prof. Anant A. Rindhe
Dr. Sandip B. Kale

Organized by

DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE & DEPARTMENT OF HISTORY

YESHWANT MAHAVIDYALAYA, SELOO
NAAC Reaccredited by B Grade
| Ph. 07155-220227 | Email : principal_seloo@yahoo.com | Website : ymseloo.edu.in

Scanned with OKEN Scanner

ISBN NO: 978-93-83619-15-3

# India-Pakistan Political Relations in Present Era

Sanjay Patil
Assistant Prof. Political Science, Pankaj Kala Mahavidyalaya, Chopda, Dist- Jalgaon,
Email :-sanjaykpatil79@gmail.com, 8275517448

**Introduction :**

India and Pakistan are neighbours with a history of tensions between one another. Since the independence of India, and then Pakistan, these two states have been at odds over issues that include the Kashmir conflict. The conflict has not intensified recently, but given that both India and Pakistan have nuclear weapons, any heightened conflict between these two countries is cause for even greater alarm; there have been genuine fears that these two states would possibly fight a nuclear conflict. Therefore, diplomats have worked to reduce India-Pakistan tensions over Kashmir.

**History of Conflicts between India -Pakistan**

The history of the India and Pakistan is full of conflicts. The conflicts started right from the first day of the creation (or separation) of the two countries. Millions of Muslims were killed by either Hindus or by Sikhs during their migration from India toPakistan. The conflict of Junagadh was perhaps the first dispute between the two new countries when the Muslim ruler of the state announced to be a part of Pakistan but India became hurdle and the state was included in India. Kashmir dispute is the biggest bone of contention between the two countries. Being the largely Muslim dominated area it should had been included in Pakistan but India got its control against the will of the people. The problem is still unresolved even after a period of 71 years. Pakistan maintains Kashmiris' rights to self-determination through a plebiscite in accordance with an earlier Indian statement and a UN resolution. Pakistan also indicates to India's failure of not understanding its own political logic and applying it to Kashmir, by taking their opinion on the case of the accession of Junagadh as anexample (that the Hindu majority state should have gone to India even though it had a Muslim ruler), that Kashmir should also rightfully and legally have become a part of Pakistan since majority of the people were Muslim, even though they had a Hindu ruler. Pakistan also states that at least, the promised plebiscite should be allowed to decide the fate of the Kashmiri people.

The two countries fought several wars including the war of 1965 and 1971. As a result of the 1971 war, the eastern part of Pakistan was separated. It was all because of the Indian intervention and conspiracies against Pakistan. In the war, the Pakistani army fell to India, forcing the independence of East Pakistan, which separated and became Bangladesh. The Pakistani military, being more than a thousand kilometer away from its base and surrounded by enemies, was forced to give in.

Since the 1971 war, Pakistan and India have made only slow progress towards the normalization of relations. In July 1972, Indian Prime Minister Indira Gandhi and Pakistani President Zulfiqar Ali Bhutto met in India. They signed the Simla Agreement, by which India would return all Pakistani personnel (over 90,000) andcaptured territory in the west, and the two countries would "settle their differences by peaceful means through bilateral negotiations." According to Budania (1995), diplomatic and trade relations between the two countries were re-established in 1976.

**Political Relations :**

The political relations between Pakistan and India under Modi's government have been marked with periodic diplomatic efforts along with escalating tensions along the Line of Control (LoC). Of late, the BJP government has adopted the strategy of trying to isolate Pakistan at regional and global forums. Soon after coming into power, Modi invited former PM Nawaz Sharif at his swearing in ceremony which was a positive gesture. However, India called off Foreign Secretary level talks with Pakistan in August 2014 on the pretext of Pakistan High Commissioner's meeting with Kashmir's Hurriyat leaders in New Delhi. The cancellation of talks by India was the first serious setback to the efforts by Pakistani leadership to normalise relations. Since 2014 to date, the Line of Control (LoC) and Working Boundary have not only remained tense, but also witnessed repeated violations coupled with hostile statements by Indian politicians against Pakistan.

Over the past two odd years, the political and diplomatic relationship between Pakistan and India has swung back and forth like a pendulum. During March 2015, Indian Foreign Secretary S. Jaishankar met with Pakistan's Foreign Secretary, Aizaz Ahmed Chaudhury as part of SAARC Yatra at Islamabad and spoke about forging a cooperative relationship with Pakistan. But in June 2015, war of words escalated after Modi's remarks



Scanned with OKEN Scanner

 ISBN NO: 978-93-83619-15-3

that India had supported East Pakistan separation from Pakistan in 1971. Relations seemed to take a positive turn when in July 2015, Modi and Sharif met on the sidelines of the Shanghai Cooperation Organisation (SCO) Summit in Ufa and announced holding bilateral security talks, and reinstated their commitment to restart the dialogue process. But in August 2015, talks between National Security Advisors AjitDoval and Sartaj Aziz collapsed after India was angered about Islamabad's invitation to Kashmiri leaders to consult on the talks. On November 30, 2015, in the wake of Climate Change Conference in Paris, the two leaders again reiterated their commitment to the dialogue process.

During December 2015, the National Security Advisors, Doval and Janjua met in Bangkokand the External Affairs Minister SushmaSwaraj met former Prime Minister Nawaz Sharif and Sartaj Aziz, former Advisor to Prime Minister on Foreign Affairs, ahead of the annual Heart of Asia Conferencein Islamabad which was followed by an unscheduled stopover at Lahore by Modi. The meeting created hope that bilateral dialogue would restart. However, relations deteriorated in January 2016, when India blamed Pakistan for the Pathankot attack and suspended dialogue. In April 2016, Indian and Pakistani Foreign Secretaries met at New Delhi, but again relations became strained when India refused to attend the SAARC Summit scheduled to be held in November 2016 in Pakistan by blaming it for facilitating Uri attack in the last week of September 2016.Diplomatic relations, which was already strained, became exacerbated after New Delhi and Islamabad decided to expel diplomatic missions on charges of espionage and declaring *persona non grata* and asking diplomats to leave within 48 hours.

**Improving India-Pakistan Relations :**

Given the state of conflict between these two countries, scholars and policymakers have long posited options for improved ties between India and Pakistan. Some have long argued that a reduction of nuclear weapons would be one positive step in ensuring that a major conflict with such devastating tools would not be possible. Others have suggested that cooperation is what is necessary not only to prevent a war, but also to build strong states and institutions. The Carter Center (2003) has argued that positive cases between India and Pakistan can provide a path to further cooperation initiatives; "Energy trade is one area of considerable promise. India could consume as much energy as it could receive from any and all of its neighbors. Energy relationships create dependency relationships, almost by definition. And India and Pakistan's experience with the Indus Water Treaty is one of the rare positive examples of prudence and creativity in the otherwise troubled bilateral relationship".

The Carter Center (2003) also argues for continued diplomacy. For them, it is important that conversations continue, even when violence breaks out. They recognize that by giving into the violence, it will allow "spoilers" to dictate the direction of policy on Kashmir. In the talks, it is also imperative for compromise. Moreover, it has been argued that the United States has a role in helping to improve India-Pakistan relations. The US has had a long history of ties with Pakistan–as far back as the Cold War, although there have been US concerns about Pakistan's nuclear weapons program), and despite political challenges between India and the United States during the Cold War, there has exited a far improved relationship following the fall of the Soviet Union .

Scholars and those in policy alike argue there is a lot that the United States can do to help both India and Pakistan. They can be a key actor in improving relations between the two states. For example, "Formal bilateral confidence-building measures (CBMs) agreed upon at the official and unofficial levels can help effect a new process by setting into place the building blocks for an eventual agreement, targeting substantive issues such as reducing and removing troops from uncontested areas and implementing technical safeguards to monitor infiltration. These safeguards would likely include sensor technology, provided by the United States to both Pakistan and India, to make the Line of Control harder to cross by militants. Technological deployment of this kind would likely require coordination by both India and Pakistan and would build confidence by demonstrating a concrete commitment by Pakistan to act assertively on infiltration and a willingness by both parties to work together in resolving this contentious issue".

**India-Pakistan Relations in 2017 :**

India and Pakistan continues to fight over the Kashmir region in 2017, all the while speaking against one another at the United Nations. For example, during the opening of the 2017 United Nations, both countries took turns trading verbal barbs.



Scanned with OKEN Scanner

**Conclusion :**

India and Pakistan have come a long way, witnessing several highs and lows inbilateral relations. Over the years, Pakistan's double-edged policy of engaging intalks and supporting Jihad in J&K simultaneously has been regarded as themain source of conflict and animosity with India. As a result, it was difficult forany Indian government to justify the rationale for the peace talks, whileterrorists continued to inflict heavy casualties in and outside J&K withimpunity. Nevertheless, the peace process has not been a total failure and has provideddividends to both sides which could not have accrued otherwise. For instance,conventional and nuclear CBMs have helped India and Pakistan keep mutualmistrust at bay through periodic contacts and information exchange. Byreaching a common understanding on nuclear issues with India such as linkingthe regional nuclear debate with global concerns and establishing CBMs toenhance its nuclear bonafide, especially after the A.Q Khan episode, Pakistanhas gained more than India. Similarly, transport links, meeting points along theLOC, cease-fire declarations along the LOC, IB, and AGPL, increased tradeflows, movement of people across the border, friendly exchanges betweenprofessionals, academicians, journalists, NGOs, educational institutions andparliamentary delegations have helped improve the atmospherics drastically.

As economics gained eminence in defining and shaping bilateral relationshipsin the globalised world, India's huge market offers vast opportunities to thesmaller economies of South Asian neighbours. The increase in trade volumebetween India and Pakistan shows the influence of commerce and trade inbolstering bilateral relations. It also denotes a transformation in Pakistan'sperceptions of India's rise. As India's ties with the US, China and other majorcountries continues to grow impressively, its rise as an Asian power drivesPakistan to settle its disputes before the power asymmetry grows any further. Amuch stronger India in the next eight to ten years would be less vulnerable tobullying and pressures. This explains why old ideas, thinking and mindsets arebeing replaced by new ones to provide sustenance to the peace process andexploit the window of opportunity.

**References :**


- "Expelled Indian Diplomat Leaves India," *Express Tribune*, October 29, 2016,
- "India Pulls out of Pakistan-Hosted 19th SAARC Summit," *Dawn*, September 27, 2016.
- "India–Pak Foreign Secretaries Meet: Pakistan Reaffirms Kashmir as Core Issue," *Dawn,* April 27, 2016,
- "Nawaz Sharif Invited for Modi"s Swearing-in Ceremony," *Dawn*, May 21, 2014,
- Ahmad, M., Phillips, R. &Berlinger, J. (2016). Uri attack: Indian soldiers killed in Kashmir. CNN. September 19, 2016.
- Ahmed, I. (2016). Pakistan impregnable, military insists after Kashmir 'raid'. Yahoo News. October 2nd, 2016.
- BaqirSajjad Syed, "Breakthrough at „Heart of Asia": Pakistan, India to Resume „Comprehensive" Talks," *Dawn,* December 10, 2015,
- BaqirSajjad Syed, "Pakistan, India Vow to Work Together," *Dawn*, March 4, 2015,
- BaqirSajjad Syed, "Sharif, Modi Meet today in Bid to Ease Tension," *Dawn*, July 10, 2015.
- Busvine, D. &Pinchuk, D. (2016). UPDATE 1-India's Modi, at summit, calls Pakistan "mother-ship of terrorism". Reuters. In CNBC. October 16, 2016.




Scanned with OKEN Scanner